

लढा पावनखिंडीतला



लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा मरता कामा नये...

स्वामी कार्याला समर्पित
वीर बाजी प्रभू देशपांडे






भाग १
₹ ५०

सादरीकरण -
विंग कमांडर
शशिकांत ओक.
(९८८१९०१०४९)

जागतिक किर्तीच्या महान सेनानायक शिवाजी महाराजांना समर्पित



पावनखिंड स्मारक



छत्रपती शिवाजी महाराज



पावनखिंड स्मारक

महत्वाचे साथीदार - वाटाडे - भाग १



प्रतिरूप शिवा (जी) काशीद



सिद्दी जोहर हबशी सरदार (?) प्रातिनिधिक चित्र

नंतरच्या काळात महाराजांची मदत मागणारा सिद्दी मसूद





पावनखिंड - कासारी नदीच्या पात्राची घळ



पावसाळ्यात दरीतील झाडीत लपलेल्या जवानांना वरून पाहणे देखील अवघड आहे.




पावसाळ्यात गर्द झाडीने नटलेल्या नदीच्या दरीतील पात्रात उतरणे धोक्याचे आहे.

वरून शांत दिसणारी खोल घळ



भरपावसाळ्यात खिंडीतील जलप्रपाताचे रौद्ररूप



लढा पावनखिंडीतला प्रस्तावना

प्रकरण - १

- पावनखिंडीच्या लढ्यातील दोन्ही बाजूंचे सैन्य बळ, त्यांची वैशिष्ठ्ये यावर मिलिटरी कमांडर विचार करताना – विविध लेखकांनी या लढ्याची वर्णने केली आहेत. (ती एकमेकांशी मेळ खातातच असे नाही.)
- शिवाजी महाराजांच्या सैन्याला मिरजेत वेढा अयशस्वी ठरला म्हणून व सिद्धी जोहरला आपल्यावर स्वारी करायला पाठवायला सैन्य निघाले आहे असे समजताच विस्तीर्ण आणि जिंकायला अवघड अशा सर्वात जवळच्या पन्हाळा गडाची निवड केली गेली असावी.
- तेथून पुढे कोकणात जाऊन नंतरच्या हालचाली गरज पडेल तशा करता येतील. असा विचार करता येतो. मध्यंतरीच्या काळात नेताजी पालकर दोन वेळा महाराजांच्या मदतीला येऊनही सिद्दीच्या धूर्त सैन्य हालचालींमुळे दोन्ही सैन्याची चढाई परतवून लावली गेली.
- आणखी काही भाग महाराजांच्या अख्त्यारीत आणला तर विजापूरच्या अदिलशाहीत दुफळी माजून शकले होतील, असा महाराजांचा होरा असावा.

मिलिटरी कमांडरांच्या मांडणीची पार्श्वभूमी

- जितका नव्याने मिळवलेला प्रदेश पदरात पडेल तो पुढेमागे मुगलांशी वाटाघाटीत या परस्पर मिळवलेल्या विजापूरच्या राजसत्तेतून वाटा द्यायला सोईचे होईल. वगैरे वगैरे... अंदाज बांधता येतात... असो.
- शिवाजी महाराजांच्या बरोबर पन्हाळगडावर किती सैन्य असावे? सिद्दी किती सैन्याची जमवाजमव करून वेढा घालायला लागला असावा? त्याच्या नेतृत्वाखाली सैन्यात कोणा कोणा सरदारांचे सैन्य होते. यावर विचारकांनी लेखन केले आहे. पैकी खालील वाचनात आले. त्यातील प्रत्येक जण काय म्हणतो ते सादर केलेले नाही.
- ‘असावे किंवा असावेत’ असा शक्यता दर्शक शब्द प्रयोग केलेला आहे. याशिवाय ही शक्यता असू शकतात असे यातून सुचवायचे आहे.
- शिवाजी महाराज प्रताप गडावरील अफज़लखानाला मारून मोहिमेला निघाले होते. त्यावेळी साधारण १० हजार सैनिकांपैकी निदान ५ हजार पेक्षा कमी घोडदळ व पायदळ मिळून बरोबर असावे असे विविध इतिहासकार सुचवतात.
- पन्हाळगडावर पोहोचेपर्यंत त्यातील मृत व जखमी वजा केले तर ते साधारण ४ हजारापेक्षा जास्त नसावेत. शिवाय गडावर देखभालीसाठी साधारण ५०० धरले तर ती संख्या कमी जास्त ४००० असावी.

बहामनी राज्याची ५ शकले

- नव्याने भरती झालेल्या साहसी मुस्लिम तरुणांना उत्तर भारतातील राजकारणात आपले बस्तान स्थिर करून राहिलेल्या सरदारांसमोर आपल्या कर्तृत्वाला वाव मिळेल असे दिसेनासे झाल्यावर ते भारतातल्या दक्षिणेकडे मोहिमेत सहभागी होऊन परत न जाता आपले बस्तान तिथेच बसवायला पाहू लागले.
- त्यातूनच बहामनी राज्यातील सरदारांच्या आपापसात वाटण्यात पाच संस्थाने झाली. म्हणूनच त्यांचा मुगल सत्तेशी संघर्ष होत होता. जरी ते धर्माने मुसलमान असले तरी विविध उपजाती, जमाती, पंथ, भाषा यात वाटले गेल्याने ते आपापसात सत्तेसाठी काहीही करायला तयार असत. तेंव्हा त्यांना आपण एकाच धर्माची लेकरे आहोत वगैरे भाबडी भावना मनात येत नसावी. असो.
- या सर्वसाधारण आढाव्यातून सिद्दीच्या सैन्य रचनेत एकसंधपणा कमी असावा. काही आज्ञा दिल्या तरी त्या लगेच पाळल्या जातीलच अशी खात्री नसावी. फाजलखानाचे विजापुर दरबारातील प्रस्थ सिद्दीची एक डोकेदुखी असावी. म्हणजे अत्यंत तातडीने सैन्य जमा करून त्यांना रवाना करणे हे सहजी होणारी बाब नसावी.

पूर्णाकृती पन्हाळा किल्ला दर्शन



इतिहासकार आणि अन्य अभ्यासक

- सेतुमाधव पगडी – पद्मविभूषण बाबासाहेब पुरंदरे - प्रा. प्र. के. घाणेकर - श्रीनिवास सामंत - गजानन मेहेंदळे - निनाद बेडेकर - श्री विजय देशमुख - सर जदुनाथ सरकार प्रा. नामदेवराव जाधव- डॉ. विश्वास पाटील, व अन्य
- इतिहासकारांचे लेखन विचार व विविध आकडे वाचल्यावर निदान ३५ हजार पायदळ, १० हजाराच्या वर घोडदळ सैन्य असावे.
- घोडदळ, काही तोफखाना आणि तळ ठोकून राहायला गरजे प्रमाणात तंबू, शिधा सामुग्री, जनावरांच्या चाऱ्याची, पाण्याची सोय वगैरे गोष्टींचा समावेश होतो. रुस्तुम जमा व फाजल खान (अफज़लखानाचा वाचलेला मुलगा) हे पठाण, तुर्की होते.
- तर सिद्दीजौहर व त्याच्या जावई मसूद हे हबशी सध्याच्या इथियोपिया व आसपासच्या देशातील काळे, किरकोळ देहयष्टीचे, त्या किंवा त्यांचे पूर्वज गुलाम म्हणून भरती झालेल्या लोकांचे आश्रित म्हणून कमी मानाच्या दर्जाचे म्हणून पाहिले जात असत.
- तुरक, उझबेग, इराणी, कुर्द, अफगाणी व सध्याच्या पाकिस्तानातील 'फाटा' मधील कबीलेवाले वगैरे (या सर्वांसाठी "पठाण' सर्वसामान्य निर्देश करतो) स्वतला असली आणि शासक वर्गातील बडे दावेदार मानत.

सरदार बाजीप्रभूंचे सैनिक पारंपारिक भात शेती करणारे शेतकरी

- वरील विचार कथन याकरिता केले आहे की शिवाजी महाराजांच्या मागे पाठवायला लागणारे सैन्याची जमवाजमव करायला, त्यांना रात्रीच्या पावसात बाहेर पकडायला जाताना ते खुष नक्कीच नसावेत. नक्की मार्ग कुठला निवडावा, वाटाड्यांवर किती विसंबून राहायचे?
- घोडदळ हे शोधायला पायी जाणाऱ्या सैन्याला उपयोगी असले तरीही पायदळाशिवाय असा घनदाट जंगलात घोड्यावरून लढाईत विजय मिळविला जाणे दुरापास्त असणार. वरील गरजा जसा जसा गड घ्यायला उशीर व्हायला लागला तसतशा वाढून गेल्या. 'वेळ' संकल्पनेवर विचार करताना यावर आणखी विचारणा करता येईल.
- भात शेतीसाठी प्रसिद्ध भोरच्या हिरडस भागातील बांदल सैनिक व त्यांचे सरदार बाजीप्रभू महाराजांनी निवडले यामागे ते सैनिक पारंपारिक भात शेती करणारे शेतकरी असावेत.

चिखल आणि पावसात तासंतास उभे राहायचा सराव असलेले बांदल

- ❖ त्यांना भाताची रोपे लावताना आणि अन्य कामासाठी चिखल आणि पावसात तासंतास उभे राहायचा काटकपणा जात्याच असल्याने ते इतरांपेक्षा जास्त उपयोगी वाटले असावेत.
- ❖ वाटाघाट करून, इंग्रजांना बोलावून लांब पल्ल्याच्या तोफा गाड्यावरून आणायला लागेपर्यंत व नेताजी पालकरांना दोन वेळा वेढा तोडून गडाच्या दरवाजापाशी यायला जमले नाही.
- ❖ इथपर्यंत घटना घडल्या होत्या असे मानून पावनखिंडीतला लढा कसा आखला आणि पार पडला यावर आजच्या मिलिटरी कमांडरच्या विचाराने पट मांडून आहे.
- ❖ प्रस्तावना प्रकरण १ समाप्त

लढ्यातील दुर्लक्षिलेले - वाटाडे! - प्रकरण २

- ❖ पन्हाळ्यामधून सुटका करून घेण्याच्या महाराजांच्या मोहिमेत सर्वात महत्त्वाचे होते ते म्हणजे त्यांचे वाटाडे.
- ❖ हे वाटाडे कोण असावेत? त्यांची निवड महाराजांनी कशी केली असावी? या वाटाड्यांना योग्य तो रस्ता खरोखरच दाखवता आला का? त्यांच्या हातून काही गफलत तर झाली नसेल?
- ❖ आणि झाली असेल तर त्यावर मात महाराजांनी कशी केली असावी या सर्व बाबी मिलिटर कमांडरांच्या आखणीच्या कारवाईत फार महत्वाच्या ठरतात. या अंगाने प्रस्तूती करायचा प्रयत्न आहे.
- ❖ जेंव्हा सुटकेची रात्र ठरवली गेली असावी त्याआधी महाराजांनी गडावरील अनेक जणांची विचारपूस करून ज्यांना गडावरून खाली उतरण्याच्या विविध लहान मोठ्या वाटा आणि गजापूर पर्यंत जाण्याच्या मार्गाची माहिती असावी.
- ❖ उपस्थितांपैकी अनेक जणांनी आपल्याला वाटांची माहिती असल्याचा दावा केला असावा. या सर्वांना वेगवेगळ्या गटात वाटून महाराजांच्या विविध सरदारांनी त्यांच्या वाटांची खात्री करून घेण्यासाठी वेगवेगळ्या बैठका घेतल्या असाव्यात. शेवटी त्यामधील तीस-चाळीस जणांचा विचार करून त्यांना वेगळे बोलावून घेऊन कसे जायचे याबाबत चर्चा केली असावी

सध्याचे इरले घेतलेले शेतकरी...

जळवांचा जलवा !







जळवांचा जलवा!
[**वाटेत एका गोष्टीपासून सावध राहिले पाहिजे, त्या म्हणजे "जळवा". पावसाळ्यात सह्याद्रीच्या अनेक परिसरात या दिसतात. पण या ट्रेकमधे त्यांचा उपद्रव जास्तीच जाणवतो. मला तरी या रक्त पिणाऱ्या जळवांचा त्रास झाला नाही, पण काही सोबत्यांना त्यांनी प्रसाद दिलाच. (सौजन्य - दुर्गविहारींचा धाग्यातून जमवलेली माहिती)

वाटाड्यांचे
रेनकोट इरले



मिरवणूकीसमान पायी जाणारे जत्थे

- अगदी पुढे दोन जणांची एक जोडी वाटेच्या डाव्या अंगावरील आणि दुसरी जोडी उजव्या अंगावरील खुणाखाणा शोधत जाताना ओहोळ, खाचखळगे, निसरड्या जागा, वाटेत आडव्या येणाऱ्या झाडी, फांद्या यातून वाटेत चुकामूक न होता वाटाडे निघाले होते.
- शेवटच्या मावळ्यांना यायला जमेल असे वाट काढत जायचे ठरले असेल. त्यांच्या मागे मागे वाटाड्यांच्यातील 'पक्के' म्हणून बरोबर घेतलेले काही वाटाडे, त्यांच्या मागाऊन येणाऱ्या महाराजांच्या बुट्टी डोलीशी संपर्कात राहून आपण बरोबर दिशेने आणि खुणेच्या ठरलेल्या वाटेवरून निघाल्याची खात्री करून देत असावेत.

वाटचालीतील अडथळे

- एकूण ६०० जणांच्या पायदळाची विभागणी सध्याच्या* परंपरेने ४ कंपनींमध्ये केली असे मानले तर प्रत्येक कंपनी कमांडर, आपल्या बरोबरचे सैनिक मागोमाग येत आहेत का? कोणीतरी मागे राहिले तर का व किती? मागच्या कंपनी कमांडरच्या बरोबर यायची व्यवस्था आधीच ठरली असावी.
- रात्रीच्या वेळी, वाट सोडून भर पावसात, नाले, ओढे भरभरून वाहताना त्यातून जाणाऱ्या सैनिकांवर लक्ष ठेवून कंपनी कमांडरच्या हाताखालच्या प्रत्येक प्लाटून कमांडरचे काम असावे.
- पाण्यातील खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज चुकल्याने पाय मुरगाळणे, खरचटणे या सारख्या किरकोळ पण चालायच्या गतीला बाधा आणणाऱ्या घटनातून व रक्त पिणाऱ्या ** जळवांच्या तडाख्याने अनेक जणांचा वेग मंदावला असावा.

संपर्क संकेत

- हातातील काठीचा आधार घेऊन तोंड बंद ठेवून चुपचाप कमीतकमी आवाज करत जायचा प्रयत्न असावा. एका मागे एक येणाऱ्या ४ कंपनींच्या बरोबर पुन्हा दोन वाटाड्याची जोडी ठेवून चालताना पडणाऱ्या अंतरामुळे आधीच्या कंपनीचा मागच्या कंपनीशी सतत संपर्कात राहायला व नेमक्या वाटेने जायला मार्गावर लक्ष ठेवून असतील.
- वेळोवेळी तोंडात बोटे घालून शिट्ट्यांच्या संकेतातून सर्व सैनिक आणि वाटाडे यांच्यात मेळ बसवला जात असावा.
- पावसांच्या सरी अती तीव्र झाल्यातर महाराजांच्या डोलीशी संपर्कात राहून थांबायचा आदेश सर्वांना पोचवायला संकेत केले जात असावेत.
- डोक्यावरच्या इरल्यांतून टपकणाऱ्या पाण्याच्या धारा, पाठीला बांधलेल्या ढाल-तलवारी, काही खायला बरोबर आणलेले, हातात लाठी किंवा पातळ बांबूचे भाल्याचे असा साधारण वेश असलेल्या प्रत्येक मावळ्यांनी पायात काय घातले असावे किंवा नसावे यावर विचार केला जावा.

बांबूच्या बुट्टी डोल्या व डोली वाहक



शिवाजी महाराज, काही वयस्कर सरदार, वाटेत जखमी झालेल्यांना बुट्टीडोलीत बसायची सोय असावी.
बुरुडांकडून बनवलेल्या बळकटपण हलक्या बुट्ट्यात तोडफोड हत्यारे, गळ, कासरे, दोरशिड्या, दांड पट्ट्यांचे जोड, खायचे सामान, बरोबर असावे.



कासारी नदीचे भरलेले पात्र पार करायला लागणार याची माहिती असल्याने, याच बुट्ट्या प्रवाहात टाकून तरंगायची सोय पण पाहिली गेली असावी.

प्रातिनिधिक चित्रे



कंपनी कमांडरांच्या डोल्या समावेत अंधारात दिसतील असे अंतर ठेऊन वाटाडे जात असावेत. पाणी भरल्याने वाटेतील खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज घ्यायला पुढे १-२ जण असावेत. डोलकर जोडी खांदे पालट करत असावेत.


बरोबर नेलेले अवजड युद्धसाहित्य

- ❖ या शिवाय महाराजांच्या बुट्टी डोलीला उचलून नेताना त्यांच्या बरोबरच्या राखीव दलासाठी दोर-शिड्या, जादाचे भाले, तीर कमानी, तलवारी, दरवाजे फोडायला घण, पहारी या सारख्या अत्यंत जरूरच्या सामानाची वजनदार ४-५ बुट्ट्यांची ओझी असावीत. त्याच बुट्टीडोल्यांना उलट्या करून वाहत्या प्रवाहात पोहायला पकडून मदत म्हणून वापरता येते.
- ❖ अशाच विविध शस्त्रांच्या ४-५ बुट्टीडोल्या प्रत्येक कंपनी किंवा प्लाटून बरोबर असाव्यात. बाजींच्या बरोबरच्या सैनिकांत दांडपट्टे प्रवीण पथकासोबत १०-१५ दांडपट्ट्यांचे जोड बरोबर असावेत.
- ❖ पौर्णिमेच्या रात्रीच्या काळोख्या अंधुक प्रकाशात खांदे बदल करत करत एकदम चढ आणि उतार असलेल्या ठिकाणी काळजीपुर्वक जाताना त्यांची गती तासाला २ किमी किंवा त्याही पेक्षा कमी असावी.

समरूप शिवाजींची बतावणी

- महाराजांचा मार्ग आणि तोतया शिवाजी यांच्या गडावरून खाली उतरण्याच्या वाटा, दरवाजे वेगळे असावेत? ते एकाच वेळी बरोबर निघाले असावेत आणि विशिष्ट भागात सुखरूप पोचल्यावर मग वाटांची दिशा बदलून पुढे गेले असावेत यावर विचार केला जाऊ शकतो.
- या अभ्यासात मिलिटरी कमांडर दोन्ही शिवाजी आपापल्या ठरवलेल्या वेगवेगळ्या एकदम चढ-उतार असलेल्या दरवाजातून गराडा पडलेल्या सैनिकांना चुकवण्यासाठी लागणाऱ्या वेळेची संधी पाहून निसटले असावेत असे मानतात. म्हणून तोतया समरूप शिवाजी मसाईपठारावरून कोकणात जाणाऱ्या रुळलेल्या मार्गाने जात असावेत.
- पकडले नाही गेले तर अंबा घाटातून उतरून कोकणतळ गाठायचा आणि खऱ्या शिवाजींची पन्हाळ्यातील बातमी नेताजी पालकरांना सांगायची. पकडले गेले तर विशाळगडाचे अजिबात नाव देखील काढायचे नाही असे ठरले असावे.

मिलिटरी फॉर्मेशन्स



First Army
Third Army
Fifth Army
Field Army
(2-5 Corps)
I Corps
III Corps
V Corps
XVIII Corps
Corps
(2-5 Divisions)
Corps
(2-5 Divisions)
10 Active Divisions
2 Integrated Divisions
8 ARNG Divisions
Division
(3 Brigades)
10,000 - 18,000 Soldiers
Brigade
(3 or more Battalions)
Brigade
(3 or more Battalions)
3000 - 5000
Soldiers
Brigade
(3 or more Battalions)
Battalion
(3-5 Companies)
500 - 900 Soldiers
Company
(3-4 Platoons)
100 - 200 Soldiers
Platoon
(3-4 Squads)
16 - 40 Soldiers
Squad
(4-10 Soldiers)
Command Level
General
Lieutenant
General
Major General
Colonel
Lieutenant Colonel
Captain
Lieutenant
Staff Sergeant

शिवाजी महाराजांची सैन्य रचना

पायदळ

- ९ शिपायांवर १ नायक
- ३ नायकांवर - १ हवालदार
- ३ हवालदारांवर - १ जुमलेदार
- ३ जुमलेदारांवर - १ नाईक/फौजदार
- १० फौजदार/नाईकांवर - १ हजारी मनसबदार
- ७ एक हजारी मनसबदारांवर - सप्त हजारी मनसबदार
- वरील सर्वांचा अधिकारी- सरनोबत/सरसेनापती

किल्ल्याचे अधिकारी - किल्लेदार सबनीस, कारखानीस, हवालदार.

घोडदळ

- २५ घोडेस्वारांवर - १ नियंत्रक (हवालदार)
- ५ हवालदारांवर - १ जमादार
- १० जमादारांवर - १ (एक हजारी मनसबदार)
- ५ एक हजारी मनसबदारांवर - १ पंच हजारी मनसबदार
- सर्व पंच हजारी मनसबदारांचा अधिकारी - १ सरनोबत(सर्वोच्च अधिकारी)



❖ यात दोन प्रकार असत. एक 'बारगीर' आणि 'शिलेदार'. बारगीर म्हणजे सरकारी घोडेस्वार. यास सर्व सामान शिवाजी महाराजांतर्फे दिले जाई. शिलेदार म्हणजे ज्याच्याकडे स्वतच्चा घोडा व आवश्यक लढाईचे सामान आहे तो.

❖ त्यात तैनाती फौज व राखीव फौज असे दोन प्रकार होते. तैनाती फौजेत बारगीर तर राखीव फौजेत शिलेदार असत. घोड्यांची निगा राखणारे-मोतद्दार. दर २ माणसांमागे तीन घोडे ठेवले जात.



दांडपट्टा, तलवारी, ढाल, गोफण शस्त्र सामग्री



गोफण गोटे





दांडपट्ट्याची आतून मूठपकड

आधुनिक काळात तलवारबाजी आणि अन्य मराठ्यांची शस्त्रे चालवण्यात प्रवीण तरूण-तरुणी आहेत त्यांनी अशी प्रदर्शने लावून लोकप्रियता मिळते आहे.

समरूप शिवाजींचे वाटाडे - प्रकरण ३



अपरात्री बाहेर जायचा परवाना
न बाळगणाऱ्यांच्या बतावणीचा घोळ



- समरूप किंवा तोतया शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली काही वाटाडे, पालखी सारख्या डोलीत महाराजांना ज्यांनी पाहिले होते अशांना ते महाराज असायची शक्यता निर्माण करेल असा पोषाख आणि आभूषणे घालून निघाले असावेत.
- पावसांच्या सरींनी चिंब भिजलेल्या तोतया शिवाजीं सोबत गेलेल्या सैनिकांना महाराज खरोखरच कोकणात जाणार नसल्याचे माहित नसावे इतकी गुप्तता 'फक्त गरजेच्या लोकांसाठी' तत्वावर पाळण्यात आली असावी.
- त्यांच्याकडे मसाई पठारावरून जाणाऱ्या अंबा घाटातील मार्गाचे वाटाडे असावेत.

व्यर्थ न गेलेले बलिदान

- आपल्या बरोबरच्या सैनिकांसह जात असताना, मसाई पठारावरील मेट्याच्या आसपास गस्त घालणाऱ्या सिद्दी जोहरच्या शिपायांच्या नजरेस पडले असावेत. इतक्या रात्री, भर पावसात, जाणारे कोण असावेत याबद्दल शोध घेण्यासाठी काही सैनिक त्यांच्या मागोमाग घोड्यावरुन आले असावेत. अंधारात हे आपले सैनिक नाहीत.
- वेशावरून ते मराठे सरदारांच्या सैनिकांतील जथ्था असावेत, परंतु रात्रीच्या वेळी बाहेर जायचा परवाना न बाळगणाऱ्यांची ही बतावणी की 'त्यांना कोकणात जायचा आदेश आला आहे म्हणून ते तातडीने जात आहेत' खोटी असावी असे संशय घेऊन त्यांनी त्यांना खाली उतरवून चौकशी केली असावी.

शिवा काशीद समाधी



नेबापुर-पन्हाळा पायथा.

स्वप्नात रंगलो मी - सिद्दी जोहर

- ❖ मराठीत बोलणाऱ्या तोतया शिवाजीचा कडक आवेश पाहून पथकाला सिद्दी जोहर यांच्या समोर उभे करणे गरजेचे वाटून त्यांना परत फिरायला लावले गेले असावे.
- ❖ हे पथक गडाच्या पायथ्यापासून २ - ३ किमी अंतरावर पकडले गेले असे मानले तर गडाच्या विरुद्ध दिशेच्या तीन दरवाजा भागातील खालच्या सपाट भागात मुख्य तळ ठोकून बसलेल्या सिद्दीच्या समोर यायला निदान १ तासापेक्षा जास्त वेळ लागला असेल.
- ❖ मधल्या काळात ज्या सरदारांच्या तुकडीतील ते मेटकरी होते त्यांना कळवले गेले. ते सरदार बातमीची शहानिशा करण्यासाठी सिद्दीच्या तंबूत हजर झाले असावेत.
- ❖ पावसाने संतत धार लावली असताना, उद्या शिवाजीने पांढरे निशाण धरून शरणागती पत्करली की पुढे काय करायचे? त्याला बरोबर घेऊन कर्नूल प्रांतातील आपल्या वर्चस्वाखाली राज्य करायला मनवायचे? का विजापूरच्या कमकुवत राज्यसत्तेची मान्यता मिळवून आपला मार्ग मोकळा करायचा?
- ❖ का शिवाजी सोबत वेगळा करार करून पुढील काळात दोन्ही बाजूंनी विजापूरकर आदिलशाहीचा खातमा करून ती गादी बळकावण्याची? का मोगलांचा नवा सेनापती शाहिस्तेखानाकडून शिवाजीला काबूत आणायला आपण मदत करावी?
- ❖ मुगलांना आपल्या सैन्याची गरज नसेल तर शिवाजीला आपल्याकडे वळवून शाहिस्ताखानाला औरंगाबाद व बऱ्हानपुराकडे ढकलायला जवळ करावे?

ये तो असली सिवा नहीं है' !

- सर्व पर्यायांवर मनांत विचार आले असताना अचानक मेट्यावरून पकडलेल्या जथ्थ्याला समोर पाहताना 'हा शिवाजी तर नाही?' असे त्याला वाटत राहिले असावे. मृत अफझलखानाचा एकटा वाचलेला मुलगा फाजलखान तंबूत येताच, पाहता क्षणी 'ये सिवा क्या कर रहा रात में?' असे विचार करत असताना
- सर्व गोष्टी लक्षात येऊन सिवाने दगा देऊन आपल्याला फसवले आणि तो पळून जाताना अलगद हातात आल्याने सुखावलेल्या सिद्दीची झोप, 'ये तो असली सिवा नहीं है' या वाक्यानिशी खाडकन उतरली असावी.
- ‘गड उद्या खाली करून पकडले जाऊ नये म्हणून लपून कोकणात चाललो आहोत’. अशा वारंवार केलेल्या बतावणीतून तोतया सिवा काशीद आणि साथीदार कैदेत जीव गमावून बसले असावेत.
- या सर्व प्रकारात कमीतकमी आणखी एक तास वेळ गेला असावा. सिद्दीने आपल्या विश्वासातील म्हणून मसूद या जावई नातलगावर ताबडतोब त्याच्या घोडदळातील सैनिक पथकांना कोकणाच्या वाटेने खऱ्या शिवाजींच्या शोधात जायचा हुकुम केला खरा शिवाजी किती हजार सैन्य घेऊन गेला असावा याचा अंदाज घेतला असावा.

पराभूत मानसिकतेचे अस्वस्थ सिद्दीचे सैन्य

- ❖ ज्या वाटेवर तोतया शिवाजी पकडला गेला तोच मार्ग धरून ते निघाले असे मानले तरी रात्रीच्या प्रवासात घोडे बुजणे, सुरवातीला जे घोडदळ गेले त्यांच्यामुळे ओली जमीन जास्त चिखलाची होऊन मागावून येणाऱ्या घोडदळाला अनेकदा उतरून घोड्यांना लगाम धरून नेणे प्राप्त झाले असेल.
- ❖ ऐनवेळी सोपा झेल सुटलेल्या किंवा जवळूही गोल करता न आल्याने खेळाडूंची पराभूत मानसिकता जशी बराच वेळ टिकून असते तशीच अवस्था सिद्दीच्या सैन्याची झाली असेल.
- ❖ चार महिने गडाला गराडा घालून बसल्याने एक प्रकारची शिथिलता आलेल्या सेनेची भर पावसात मध्यरात्री झालेली परवड बोचणी देत असेल. आपल्या मुख्य सरदाराला फसवून शिवाजीने जो विश्वासघात केला याचा राग व हताशा प्रत्येक शिपायाला सतावत असणार.
- ❖ अशा पराभूत मानसिकतेने निघालेल्या सैन्याला माहित नसलेला रस्ता, पावसाच्या सरींनी चिंब भिजलेल्या अवस्थेतून आपापल्या घोड्यांना सांभाळत पुढे सरकत जायचा वेग कमी असला तरी पायी चालणाऱ्या शिपायांपेक्षा जास्त असावा.

सिवा पन्हाळगडावरच असायची शक्यता मोठी आहे !

- इतके मोठे सैन्य बाहेर जाते तरी आपल्या सैन्याला पत्ता लागू नये यासाठी सर्व मेटेकऱ्यांना समोर हजर करून कसून चौकशी केली गेली असता शिवा पन्हाळगडावर असायची शक्यता खूप मोठी आहे असे जाणवले असेल. जर तो गड सोडून फरार झाला असेल तर त्याला विशाळगडावर जायच्या शिवाय पर्याय नाही.
- तिथे आधीच सुर्वे आणि दळवीच्या सैन्याचे तळ ठोकून आहेत यामुळे सिवाला तिथे जाऊन देखील पकडता येणे शक्य आहे. असा विचार करून मसूदच्या मदतीला अन्य सरदारांनी आपापले घोडदळ मसूदच्या पाठोपाठ पाठवायला हुकूम दिला असावा. 'पायदळाशिवाय जंगलातील वाटांवरील लढाईत सरशी होणार नाही' हे ओळखून सिद्दी जोहरने पायदळाला ताबडतोब निघायचा आदेश दिला असावा.
- शिवाजी निसटून कमीत कमी २ तास उलटून गेले असल्याने सिद्दी मसूद सासऱ्याच्या आज्ञेने आपल्या हबशी जातीच्या सैनिकांचे घोडदळ व बाजी घोरपडे या मराठा सरदाराच्या या भागाची व भाषेची माहितगार असलेल्या सेनेला बरोबर घेऊन रात्री भर पावसात तातडीने निघाला.
- जसे जसे इतर सरदारांना बातमी लागली तसे त्यांचे घोडदळ घेऊन मसूदच्या मदतीला निघाले.

रातोरात निघालेले हबशी सैनिक



- ❖ शिवाजी महाराज निसटून कमीत कमी २ तास उलटून गेले असल्याने सिद्दी मसूद सासऱ्याच्या आज्ञेने आपल्या हबशी जातीच्या सैनिकांचे घोडदळ व
- ❖ बाजी घोरपडे या मराठा सरदाराच्या या भागाची व भाषेची माहितगार असलेल्या सेनेला बरोबर घेऊन रात्री भर पावसात तातडीने निघाला.


रात्रीच्या अंधारात माहित नाही अशा ठिकाणाच्या शोधात

- ❖ पायदळाची एकूण १० हजारापेक्षा जास्त सेना वेगवेगळ्या पठाण आणि अन्य सरदारांत विभागलेल्या असल्याने ती निघायला पुढचे २ - ३ तास लागले असावेत. त्यांच्या तुकड्या कमी अधिक फरकाने संख्येने त्यांच्या बरोबर ठासणीच्या बंदुका, दारूगोळा, बत्ती लावायला आग लावायची सोय, भाले, तयार बाणांचे गठ्ठे व अन्य
- ❖ सामान घेऊन रात्रीच्या अंधारात माहित नाही अशा ठिकाणच्या शोधात घेऊन जाताना त्यांना ऐत्यावेळी मिळेल त्या वाटाड्यांच्या सोबतीने घेऊन जायला भाग पडले असावे.
- ❖ त्यांना पेच निर्माण झाला असावा की मलकापूरवरून जावे का मसाईपठारावरून पांढरे पाणी कडून अंबाघाटातील मार्गाने जावे? कुंद पावसाच्या वातावरणामुळे बऱ्याच डोंगरांच्या रांगा ढगात दिसेनाशा होतात.
- ❖ सहज ओळखता येतात असे डोगरमाथे डोळ्यात भरत नसल्याने चाचपडत पुढे जावे लागणार होते… घोडे अंधाराच्या वाटेवरून जाताना नाठाळपणा करत असावेत.

धावाधाव न करता मागाऊन येणाऱ्या कुमकीतून नव्या बातमीची वाट पहाणे शहाणपणाचे...

- ❖ देशाच्या अन्य भागातील सैनिकांना साचलेल्या पाण्यातून, चिखलातील वाटेतून सहनशक्तीचा अंत पाहणाऱ्या वळवळणाऱ्या प्राण्यांमुळे व जळवा, विंचूच्या दंशाला ही सामोरे जाताना जीव गमवावे लागत असावेत.
- ❖ सतत चालून चालून वैतागलेले, भुख़े-प्यासे सैनिक युद्धाच्या मानसिकतेत पुन्हा यायला वेळ लागतो. त्या काळरात्रीतून सकाळ झाल्यावर आठ वाजेपर्यंत ३५ ते ४० किमी अंतर कापल्याने सिद्दी मसूद बरोबर तातडीने आलेल्या ३०० ते ५०० घोडदळ सैनिकांची प्रथम तुकडी मागावून येणाऱ्या सेनेच्या मदतीची वाट पाहात विश्रांती घेत असाव्यात.
- ❖ तोतयाने सांगितले तसे शिवाजी खरोखरच पळून गेला नसावा कदाचित तो पन्हाळ्यात बसून असून आपल्या सैन्याच्या विस्कळीतपणाचा फायदा घेऊन कोल्हापुराच्या दिशेने जाऊ शकतो किंवा वाटाघाटींना मुकाट्याने बसतो.
- ❖ अशा अनेक शक्यतांमुळे उगाच धावाधाव न करता मागाऊन येणाऱ्या कुमकीतून नव्या बातमीची वाट पहाणे शहाणपणाचा मार्ग वाटून तो थांबला असावा.

मेटे म्हणजे काय? ते कशासाठी?



मेटे - इथे पुसाटी बुरुजासमोर लावल्याने सर्व बाजूंना टेहळणी करायची सोय होते.

❖ मेटे म्हणजे गडाच्या भोवताली २ ते ५ किमी अंतरावर टेहळणीकरता लावलेली चेक पोस्ट... ती अशा मोक्याच्या ठिकाणी असावीत की तेथून दूरवरच्या हालचाली कळाव्यात. काही संशयास्पद दिसले तर त्याला तत्परतेने मुख्यालयात पेश करायची जबाबदारी...


महाराजांची निघण्याआधीची तयारी - प्रकरण ४

- साधारण रात्री ८ ते ९ च्या दरम्यान महाराजांबरोबरच्या सैन्याने अवघड जागेतून जाण्यासाठी पुसाटी बुरुजाच्या बाजूने दरवाजे किलकिले करून गडाच्या पायऱ्या उतरायला सुरुवात केली असावी.
- दिवसपाळी आणि सूर्यास्ताला सुरू होणारी रात्रपाळी अशा *दोन शिफ्ट मधे गस्त घालत रात्रभर फिरते राहायचे कंटाळवाणे पण जोखमीचे काम करताना त्यांच्यापैकी ३ ते ५ जण एक पोस्ट ते दुसरी असे करत 'जागते रहो' अशा आरोळ्या देत गस्त घालणाऱ्या शिपायांवर मुकादम गिरी करणाऱ्यांना या आरोळ्यांनी गस्ती टोळी कार्यरत आहे. असे दाखवून देता देता एक दोन फेऱ्या मारून पावसापाण्याच्या रात्री जास्त वेळ न घालवता तंबूत येऊन डोळ्यावर पट्टी बांधून विश्रांती घेत पडायचे.
- काही जणांनी भटारखान्यात जाऊन जेवायचे आणि परत येताना उरलेल्यांना डब्यातून जेवणाची सोय करायची. रात्री ९ नंतर गडावरच्या दरवाजाकडून काही उघडझाप होत नाही ना यासाठी वेगळे तैनात केलेल्यांकडून 'सब बंदोबस्त ठीक है?' असा रागरंग पाहूनताणून द्यायची.

महाराजांची बुट्टीडोली निघाली...

- *इतर पहारेकऱ्यांवर विसंबून गळक्या तंबूतून ठिबकत पडणाऱ्या पावसात घरच्यांची आठवत काढत बसायची सवय झाली असावी. कदाचित ती रात्र गस्त घालायची शेवटची ठरायची शक्यता उडत आलेल्या बातमीतून समजल्याने चार महिन्यांचा शीण डोळ्यावर अनावर झाला असावा.
- एकदा दरवाज्याच्या समोरील गस्तींना मारून बाजूला केले तर दोन पोस्टमध्ये असलेल्या अंतरामुळे अंधारात एका मागोमाग एक करत सध्याच्या रचनेप्रमाणे ४ कंपनीच्या शिपायांना बाहेर काढले गेले. त्यांनी आणखी एका पोस्टमधून गस्तींचा गळा आवळून ती निकामी केल्यावर आता वाटाड्यांच्या टोळींना बाहेर काढून पुढे जायच्या वाटांची चाचपणी करायला पाठवले गेले असावे. मग महाराजांची बुट्टी डोली व त्यांच्या खास रक्षक दलाच्या जवानांना बाहेर पाठवले गेले असावे. त्यातूनच महाराज स्वतः चालत बाहेर पडले असावेत.
- (*हवाईदलातील प्रत्यक्ष अनुभवातून गस्ती तुकड्यांच्या मनोवृत्तीत शेकडो वर्षांत फारसा फरक पडला नसावा असे जाणवते)

पुसाटी बुरुजावळील राजदिंडीतून महाराज बाहेर पडले



पन्हाळगड ते
इंजोळे ते सोनुर्ले
२१ किमी


बुट्टी डोल्यांची कावड, दुथडी नदीपार करायच्या तयारीने निघाली...

- आता महाराज वर वर्णन केलेल्या तैनाती प्रमाणे पक्क्या वाटाड्यांच्या बरोबर झपाझप पावले टाकत निघाले असावेत. पूर्ण जथ्थ्यात साधारण तीन ते चार जण वाटेच्या रुंदीनुसार एकत्र चालत असावेत. यामधे प्रत्येक कंपनीसाठीची शस्त्रे, कमानी व बाणांचे गठ्ठे, पहारी, घण, इरल्याच्या खाली लपवून
- ३ ते ४ बुट्टी डोल्यांची कावड खांद्यावर घेऊन जाताना वाटेत विश्रांतीसाठी हातातील काठीला कावडीचे दांडे टेकवून ठेवायची सोय वापर ते खांदे पालट करत असावेत.
- कावड नेणारे बुट्टी डोलीवाले, वाटाडे हे सैन्याचे 'मदतनीस' पण सैनिक नसलेले असल्याने त्यांना काम झाले की आपापल्या वाटेने परतायची मुभा असावी. जर ते शत्रूच्या तावडीत सापडले तर त्यांना न मारता त्यांना सोडून दिले जात असावे (सध्या अशांना नॉन कॉम्बॅटंट सिव्हिलियन म्हणून संबोधले जाते)
- जर तोतया शिवाजी मलकापूरच्यावाटेने मसाई पठारावरून गेले असे मिलिट्री कमांडर मानतात. म्हणून खऱ्या शिवाजी महाराजांचा मार्ग तो सोडून पर्यायी असला पाहिजे असेही मिलिट्री कमांडर मानतात. तो कोणता असावा?

इंजोळे खेड्यातून महाराज रवाना

- ❖ यावर विचार करता असे जाणवते की जर मसाईपठाराच्या दुसऱ्या अंगाने इंजोळे या सध्याच्या नावाच्या खेड्याच्या लगतच्या सखल मार्गाचा वापर केला तर जास्त चढउतार न करता (नकाशात पाहून ८०० मीटरच्या कंटूर वरून) वाहत्या प्रवाहाच्या काठाने गेले तर चिखलाचा त्रास कमी होईल.
- ❖ शिवाय आसपासच्या खेड्यातील झोपलेल्या लोकांना जाग न आणता शक्यतो बिनबोभाट पुढे पुढे सरकता येईल.
- ❖ एका विशिष्ठ ठिकाणी (सध्याच्या मांजरे गावाजवळ) कासारी नदीच्या पात्राला लागले की तो काठ पकडून गजापुरच्या सखल प्रदेशात घेऊन जाईल. ...
- ❖ खालील नकाशा पहा...

महाराजांची विशाळगडाकडे जाण्याची वाट लाल रंगातील तुटक रेषेने दर्शवली आहे.




इंजोळे - मसाई पठार पायथा - घुंगूर- सोनुर्ले



❖ ३ ते ४ बुट्टी डोल्यांची कावड खांद्यावर घेऊन जाताना वाटेत विश्रांतीसाठी हातातील काठीला कावडीचे दांडे टेकवून ठेवायची सोय वापर ते खांदे पालट करत असावेत.

❖ पावसाचा काळ, रात्र हे महत्वाचे मुद्दे गूगल नकाशाला अभिप्रेत नाहीत.

मोसूमवरून मांजरे कडे




परिस्थितीनुसार वाट बदलू...

- नकाशात दर्शवलेले २१ किमी अंतर हे पुसाटी बुरुजापासून सध्याच्या वाटेवरून मागे चालत जाऊन तीन दरवाजा ओलांडून खाली आले तर असे गूगल दाखवतोय (ते या नकाशात प्रत्यक्ष दिसत नसले तरी) म्हणून त्यातून कमीतकमी 3 किमी वाढलेले कमी केले पाहिजेत. शिवाय पावसाचा काळ, रात्र हे महत्वाचे मुद्दे गूगल नकाशाला अभिप्रेत नाहीत.
- आता खालील नकाशात महाराजांचा जथ्था सोनुर्ले करून पुढे जात असताना डोंगरांच्या कुठल्या सोंडा पकडून व घळी सोडून पुढे जायचे यावर समोर पसरलेल्या व खाली आलेल्या ढगांच्या अडथळ्यांना ते विरण्याची वाट पहात बसावे की अंदाजाने जावे असे दोन पर्याय असल्याने वेळ न दवडता पुढे जावे. समजा नंतर वाट चुकीची वाटली तर त्या परिस्थितीनुसार वाट बदलून पुढे काय करायचे ते ठरवावे असा पर्याय निवडला गेला असावा.

- धारकरी ज्या वाटेने पावनखिंडीला दर्शनाला जातात त्या वाटेवर चिखलाचा, जळवांचा प्रादुर्भाव अनुभवायला लागतो.
- इंगोले, मोसूम, सोनुर्ले वाट कडून गेले तर गुगल ८०० मीटरच्या कंटूर वरून जाते असे दाखवतो.
- वाहत्या प्रवाहाच्या काठाने गेले तर चिखलाचा त्रास कमी होईल.
- प्रत्यक्ष प्रवास करून सत्यता कळेल.



दोन पायवाटा



सोनुर्ले गावापर्यंत येताना पहाटेचे ५ झाले असावेत

- काही वाटाडे जथ्थ्यापासून पुढे पुढे जात त्या भागातील त्यांच्या नातेवाईकांला भेटून बरोबर नेण्यासाठी गुपचूप भेटून आणत असतील किंवा निदान सल्ला घेऊन येत असावेत.
- याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महाराजांनी ठरवलेली वाट गजापूरला नक्की जाते किंवा नाही याची खात्री वाटाड्यांना असली तरी अधिक पक्के वाटाडे मिळवायला महाराजांनी परवानगी दिली असावी.
- साधारण दर तासाला (संपूर्ण एक किमी लांबीचा जथ्था) २ किमी गेला असावा असे मानले तर रात्री ९ ते पहाटे ५ पर्यंत आठ तासांत १६ ते १८ किमी अंतरावर पोहोचलो असावा.
- या पुढील वाट नेमकी कशी शोधून पुढे जायचे याची खलबते करत करत बरोबर आणलेल्या न्याहरी खात विश्रांती घेतली असावी.

५० मीटर पुढचे देखील दिसत नसेल तर डोंगर-दऱ्या कशा दिसू शकत नाहीत याचा पुरावा





वाटाड्यांना कासारी नदीचे पात्र सापडेना !
प्रकरण ५



जाना था जापान! पहुंच गये चीन!! पण झाले ते बरे झाले...!!!

दुथडी कासारी नदी मांजरेपाशी पार करावी लागणार या तयारीने महाराज आले होते.

सध्याचे गेलावडे धरण व कासारी नदीचे जुने पात्र...

मांजरे कडून गजापूरच्या पठारावर



- ❖ महाराजांच्या वाटाड्यांनी ठरवलेला मार्ग कासारी नदीच्या मांजरे खेड्याच्या आसपास (सध्याच्या नकाशात ती जागा गेलावडे धरणाचा बांध असलेली दाखवली जाते.) पात्राला पकडले की गजापूरला (नकाशात धरणाच्या पाण्यात बुडलेला) मार्ग जायला सोपा होता.
- ❖ तेथून पुढे विशाळगडाच्या समोरील दरीत उतरून जर तेथील भागात सिद्दीच्या सैन्याचा तळ असेल तर त्याला कसे चकवायचे आणि विशाळगडावरच्या गडकऱ्याला खालून हमी देऊन दरवाजे उघडायला भाग पाडायचे अशी आव्हाने स्वीकारायची होती.

वाटाड्यांच्या मतभेदाची कारणे -

❖ काही वाटाड्यांच्या म्होरक्यांच्या मते सोनुर्ले नंतर बुरंबळला जाऊन तेथून मांजरेच्याजवळ कासारी नदीप्रवाहाला पकडता येईल तर

❖ काहीं म्होरक्यांचे मत पडले की येलवडेच्या पठारावरून (सध्याच्या) करणजोशी गावापाशी, खाली उतरून (सध्याच्या) कांटे गावाजवळ जरी तो मार्ग लांबचा असला तरी कासारी नदीचे पात्र नक्की येईल.

❖ एकदा नदीपात्र धरले की पुढचा गजापूरला जायचा मार्ग सोईचा होईल.

❖ (आजच्या ३डी व अन्य आधुनिक उपकरणांनी उपलब्ध नकाशाच्या सोईवरून दोन्ही बाजूच्या वाटाड्यांचे म्होरके त्याकाळात नकाशा न पाहता बरोबरच बोलत होते हे लक्षांत येते.)

दोन्ही वाटा सध्याच्या गेलावडे धरणाच्या नदीच्या पात्राकडे कशा नेतात. ते नकाशातून कळेल.



मांजरे ते विशाळगड महाराजांनी नियोजित केलेला मार्ग

- ❖ वाटाड्यांनी सुचवलेल्या दोन्हीपैकी कुठल्याही मार्गांनी महाराज गेले असते
- ❖ तर ते गजापुरच्या उघड्या माळावर मागाहून घोड्यावरून येणाऱ्या सिद्दीच्या सैनिकांना विशाळगडावर पोहोचायच्या आधीच कदाचित सापडले असते.



करायला गेलो एक ...पण घडले भलतेच !

- जर वरीलपैकी पहिल्या पर्यायातून ते गजापूरच्या वाटेला लागले असते तर किंवा दुसरा लांबचा मार्ग महाराजांनी घेतला असता तर त्यांना गजापूरच्या माळावर पोहोचायला जो जास्त वेळ लागला असता तोवर सिद्दीचे सैन्य त्यांच्या शोधात गजापूरच्या उघड्या माळावर समोरासमोर आले असते.

- मैदानातील लढाईत सैन्याची कमी संख्या, तुटपुंजे शस्त्रबळ, जास्त संख्येच्या सैन्याशी मुकाबला व्यर्थ जाऊ शकले असते. पण महाराजांचा जथ्था चुकीने पांढरेपाणीकडे पोहोचला व नंतरच्या सैन्य मांडणीतून लढ्याचे चित्र बदलून गमिनीकाव्यात रुपांतरित झाले.

‘अडचणीतून संधी शोधतो तो सिकंदर ठरतो’ असा निष्कर्ष निघतो...

जंगलातील पर्यायी वाटा



जंगलातून मांजरे गावाकडून कासारी नदीचे पात्र पकडायला असे मार्ग गूगलवरून उपलब्ध दिसतात. पर्याय इतके आहेत पैकी कमी धोक्याचा, पावसातून, न घसरता, धुक्याच्या वेळी, धाकधुकीच्या मनस्थितीत हे बिंदु लक्षात घेतले तर तातडीने जायची परिस्थिती किती जिकिरीची असावी ते लक्षात येईल.

डोंगरात अडकलेल्या ढगांच्या गच्च पुंजक्यातून अनेक पर्यायी वाटातून नेमकी वाट शोधणे कसे अवघड असू सकते याचा नकाशा

पिन क्र. ११ पाशी तिथे घोळ सुरु झाला...!
पिन क्र. २५ पाशी मांजरेची वाट चुकली



- ❖ वाटाड्यातील लोकांची एक वाक्यता नसणे आणि लोंबत्या ढगांच्या गर्दीतून हवी ती वाट न सापडल्याने जंगलातील चढांच्या अरुंद पायवाटेने पुढे सरकत जाताना 'आपण ठरवलेल्या मांजरे खेड्यात जाणाऱ्या रस्त्याने जात नसू' असे वाटून देखील
- ❖ पर्याय नसल्याने पुढे जात राहून एखादा पठारी प्रदेश आला की आढावा घेऊ असे ठरवून महाराजांचा जथ्था हळूहळू पुढे सरकत होते.

कासारी नदीच्या उगमापाशी आल्यावर... ... तोवर ढगांची पांगापांग झाली

- ❖ समोरच्या दूरदृष्यात सखोल भागातील कासारी नदीचे पुराने फुगलेले वळणदार पात्र, गजापुरच्या खेड्याचा भाग त्यापलिकडे विशाळगडाचा डोंगरमाथा वगैरे पाहता वाटाड्यांची उपयुक्तता संपल्यात जमा झाली.
- ❖ बाजी प्रभूंच्या नेतृत्वाखालची पथके भातशेतीच्या खाचरातून चालायला, कामाला तरबेज व जास्त काटक म्हणून संखेने जास्त होती.
- ❖ त्यांच्या बरोबरच्या अन्य सरदारांना बाजी प्रभूंची वरिष्ठता (सिनियॉरिटी) व अनुभव मान्य असल्याने बाजीप्रभूंना खिंडीत लपून हल्ला करायच्या मोहिमेवर निवडणे महाराजांना सोपे गेले.
- ❖ उरलेल्यांनी महाराजांच्या बरोबरच्या खास पलटनीशी संपर्कात राहून पुढची वाट धरावी असे ठरवले गेले असे मिलिटरी कमांडरांना वाटते. आपापल्या पथकांना शस्त्रे व अन्य बरोबरच्या सामानाची वाटणी करून ते लगेच डोलीकरांना बरोबर घेऊन निघाले.
- ❖ (सध्याच्या काळात याला ‘रोड क्लियरन्स पार्टी’ म्हणतात. पुढे जाऊन मागावून येणाऱ्या महत्वाच्या व्यक्ती वा सैन्याला वाटेत दगाफटका न होण्यासाठी वाटा सुरक्षित करणे हे त्यांचे काम असते.)

विश्रांती व मलमपट्टी

❖ वरीलप्रमाणे अनेक पर्यायांपैकी करणजोशीची वाट न धरता ते बुरंबळकडे गेले. एकदा जंगलातील वाटेला लागले की पुढे जितके दिसते तसे चालत राहणे हा पर्याय असतो.

❖ घनदाट जंगल, ढगांचे पुंजके, पावसात भिजलेले पोषाख, मागे कोणी, केंव्हाही येईल अशी धास्ती वगैरे मानसिक ताण ही लक्षात ठेवून महाराजांना धीराने पुढे जाणे भाग होते.

❖ असे करता करता महाराजांचा जथ्था पांढरेपाणी या पठारी प्रदेशात पोहोचला. तोवर आणखी वेळ टळून सकाळचे ९ ते १० वाजले होते. कोण वाटाडे चूक आणि कोण बरोबर हा विचार बाजूला ठेवला गेला.

❖ आता इथून पुढे कसे जायचे? यावर वरिष्ठ सैन्य पदाधिकारी व महाराजांच्यात मसलत होत होती. तोवर किती सैनिक बरोबर आले? किती वेगवेगळ्या कारणांनी पोहोचू शकले नाहीत? याची तपासणी करायचे काम महाराजांच्या सरदारांनी करून कमीत कमी १५ ते २० जणांना इथे पर्यंत येता आलेले नाही असे ठरले.

❖ ते वाट चुकून किंवा चुकवून मधून निघून गेले असावेत किंवा जखमी होऊन पुढे यायच्या अवस्थेत नसावेत असे मानले गेले. काही तरीही कसेबसे बरोबर आले तरी त्यांना विश्रांती व मलमपट्टीची गरज असावी म्हणून जमेल तसे सैन्याच्या बरोबर राहा म्हणून महाराजांनी दिलासा दिला.


मोहिम फसण्याची धास्ती




- ❖ जर समरूप शिवाजी महाराज सापडले गेले असतील तर सिद्दीचे घोडदळ कधीही आपल्याला शोधत येऊ शकते याची धास्ती शिवाजी महाराजांना होती.
- ❖ या भागातून थोडे पुढे गेले की कासारी नदीचे उगमाचे पात्र लागते त्यात लपायची सोय होऊ शकते. असे माहिती काढता समजले.

महाराजांपुढील पर्याय

- पर्याय १
- कासारी नदीच्या पात्रात लपायची सोय करून तिथेच सर्वांनी थांबावे आणि मुकाबला करावा.



- पर्याय २
- पांढरेपाणी कडून आधी ठरवल्या प्रमाणे तडक विशाळगड गाठणे.
- विशागडाच्या पायथ्याशी सर्व सैन्याने एकत्र जाऊन लढाई करणे.



शिवाजी महाराजांचा पर्याय

पर्याय ३


- ❖ महाराजांनी आणखी एक पर्याय मांडला. जर दोन भाग करून एका भागाने इथे लपून राहायचे व महाराजांनी बाकीच्यांनी खिंडीच्या पात्रात न उरता उताराच्या अन्य वाटेने गजापुरच्या जायला निघायचे. सिद्दीला खिंडीत गुंतवून ठेवल्यामुळे त्याला विशाळगडावर यायला विलंब लागेल. तोवर तिथल्या कमी सैन्याशी लढाईकरून गडावरील सैनिकांना कळवून दरवाजे उघडायला शक्य आहे.
- ❖ पर्याय १ मधे विशाळगडाच्या पायथ्याशी लढाई जास्त वेळ चालली तर मागाहून येणारे सिद्दीचे सैन्य मिळून लढाई जिंकता येणे अशक्य होईल.
- ❖ पर्याय २ मधे विशाळगडावर जायच्या ऐवजी एकत्रपणे इथे खिंडीत लढत राहिलो तर सगळेच मृत्युमुखी पडू.
- ❖ पर्याय ३ मान्य होऊन सगळे कामाला लागले, असे मिलिट्री कमांडर मानतात.

बाजी प्रभूंना योजना समजावली

- ❖ “आपण शेवटपर्यंत खिंडीतून शक्यतो बाहेर पडून नका. जोवर शेवटचा शिपाई आहे तोवर सिद्दीच्या सेनेला सिवाचे सैन्य कासारी नदी पात्राच्या खिंडीतच लपले असेल याची खात्री वाटत राहील.
- ❖ सिद्दीला मी (सिवा) पण इथेच असू शकतो याची खात्री वाटून तो विशाळगडाच्या वाटेला जायचे टाळेल.” असे विचार सांगून महाराज बाजींचा निरोप घेऊन निघाले
- ❖ बाजींच्या बरोबर पुन्हा भेट होईलच असे नाही असे वाटून भावपूर्ण गळाभेट होणे स्वाभाविक होते.



घळीतील खोली किती बदलती आहे याचा अंदाज बाहेरून येत नाही



महाराजांचा धूर्त डाव



- ❖ महाराजांनी जाण्यापूर्वी जखमी सैनिकांची विचारपूस करून म्हटले की पांढरे पाणी पासून पुढील वाटेत बसा...
- ❖ जर पाठलाग करणाऱ्या सैन्याने पकडून विचारले तर, 'हो आम्ही शिवाजी महाराजांबरोबरच होतो पण जखमी झाल्याने त्यांनी आम्हाला इथेच सोडून दिले. असे म्हणत रहा.
- ❖ आमची योजना कासारी नदीच्या पात्रात लपायची होती असे महाराजांनी आम्हास सांगितले होते'. असेही सांगायला सांगितले.
- ❖ काही परत जाणाऱ्या वाटाड्यांना मुद्दाम तिथे थांबायला लावून, 'चला आम्ही तुम्हाला त्या कासारी नदीचे उगम पात्र दाखवतो' म्हणून पाठलाग करणाऱ्या सैन्याला बरोब्बर त्या दरीत उतरवायला भाग पाडले गेले.
- ❖ त्यासाठी वेगळे जादा कामाचे पैसे त्यांना चुकते केले गेले.

शिवाजी महाराजांचे दिशाभूल तंत्र




जो पर्यंत कोणी सांगत नाही तोवर वरून या दरीत सिवाचे सैन्य लपलेले आहे याची सुगावाही लागणार नाही.

भावपूर्ण गळाभेट



- ❖ महाराज म्हणाले, “बाजी आपल्या बरोबरच्या सैनिकांना शत्रूच्या सैन्याने वरून व खिंडीत खालून दाबून धरले तर खिंडीतून बाहेर पडा व मोकळ्या जागेच्या ठिकाणी आपापली शस्त्रे, विशेषतःदांडपट्ट्याचे पथक उभे करून शेवटपर्यंत प्रहार करत रहा.
- ❖ आम्ही विशाळगडावरील परिस्थिती पाहून प्रवेश केला की ताबडतोब तोफांच्या आवाजाची खूण करून सुखरूप असल्याची बातमी देतो. पावसाचे मान पाहून धूर करता आला तर ते पाहतो”.


पावनखिंडीतील स्थाने घटना



पावनखिंडीतून खालून वर पहाताना



कानाटमळी घळ व धबधबा




वरून खाली पाहता कासारी नदीची खिंड

दोर शिड्यांच्या मदतीने धबधब्याची वाट उतरायला सुरवात


- ❖ घोड्यांच्या टापांचे कानात बसलेले आवाज दुरून ऐकून पाठलागावरील सैन्य आसपास आले असावेत असे वाटून विविध शस्त्रे व इतर सामानाची वाटणी करून बाजींबरोबरच्या सैन्याला दोर शिड्या, पाण्यात पडले तर पकडायला गळ, गोफणींच्या गोट्यांच्या पिशव्या, धनुष्य-बाणांचे गठ्ठे, दांडपट्ट्यांच्या जोड्या वगैरे शस्त्र संभार बाजींच्या सैन्याला जास्त दिले गेले.
- ❖ गडाचे दरवाजे फोडायची वेळ आली तर म्हणून पहारी, घण, जादा तलवारी, यांनी भरलेल्या बुट्टीडोल्या घेऊन महाराज सटकले.
- ❖ या दरम्यान बाजींच्या एका पथकाने नदीच्या पात्रात उतरायला पाठवलेल्या सैनिकांनी एक धबधबा लागतो तो पार केला तर खूप लांबवर घळ आहे त्यात लपता येईल असे प्रत्यक्ष पाहून निर्वाळा दिला.
- ❖ खिंड खरोखर आहे अशी खात्री करून सर्वांनी दोर शिड्यांच्या मदतीने धबधब्याची वाट उतरायला सुरवात केली.

सिद्दी मसूदचे सैनिक आले...



- ❖ धबधब्याच्या पाण्याच्या झोतातून दोरशिड्यांना लटकून बाजींनी सुरक्षित पणे घळीत सैनिकांना उतरवले. जो शत्रू उतरेल त्याचे मुंडके छाटायला तलवारी, जंबिये परजून उभे राहिले.
- ❖ संपूर्ण २ किमी लांबीच्या घळीत आपले सैनिक बाजींनी विखरून असे लावले की वरून पाहणाऱ्याला झाडीत व कपाऱ्यांच्या अडोशाने काही दिसू नये.
- ❖ तेवढ्यात वरून मुगलांच्या हालचाली, बोलाचालींचे आवाज येऊ लागले.

विशाळगडाकडे न जाता खिंडीच्या व्यूहात सिद्दी अडकला



- ❖ सिद्दी मसूदला जखमींच्या सांगण्याचा प्रभाव पडून त्याने विशाळगडाला पाठलागावर जाण्याऐवजी घळीतच सिवाला शोधून ठार मारणे सहज सोईचे वाटले.
- ❖ त्याने आपल्या सैनिकांना खाली जायला आज्ञा केली. घाईत रातोरात निघाल्याने दोरखंड, शिड्या, सामान बरोबर आणलेले नव्हते. तरीही काही काहीजण साहस करून उतरले. ते खालून काय परिस्थिती आहे हे सांगेनात. 'या अल्ला… बचाओ' अशा करूण आरोळ्यादेऊन सर्व शांत झाले. जो खाली उतरतो तो वर येत नाही अशी भीषण परिस्थिती निर्माण झाली.
- ❖ सिद्दीची खात्री झाली की सिवा इथेच लपला आहे.


वरून टिपून मारायची मोहीम

- ❖ १. घोडदळाचे सैनिक वरून नेम धरून लपलेल्यांचा वेध घेऊ लागले. दाट झाडीचा अडोश्यामुळे दगड, बाण फुकट जाताना पाहून ते ही कुचकामी ठरले. उलट खालून भिकावलेल्या गोफण गोट्यांच्या माऱ्याने जखमी होताना पाहून कोणी वाकून नेम धरायला धजेना.
- ❖ २. सिद्दीने बंदुकची आणि पायदळ येईपर्यंत मोहीम थांबवली. सिवा वाट पाहून कंटाळून आपसून खिंडीतून बाहेर येण्याची शक्यता धरून त्याने आपसे नियंत्रण केंद्र सरदारांत चर्चा करू विखुरले.
- ❖ ३. घोड्यांची खोगिरे काढून चरायला सोडले गेले. काही सैनिकांनी आपल्या आवडत्या चूर्णाच्या पुड्या तोंडात सोडल्या. दोन तासानंतर काही पायदळ जत्थे यायला सुरवात झाले.
- ❖ ४. सिवा ५-६ शे सैनिकांना बरोबर घेऊन विशाळगडाकडे निसटला आहे, हे कळले.
- ❖ ५. काही सरदारांनी सुचवले की आपण विशाळगडाला सैन्य पाठवले पाहिजे.
- ❖ ६. सुर्वे-दळवी धोकेबाज आहेत. ते ठाण्यावर हजर असताच असे नाही.

सरदारांचा सल्ला आणि मसूदचा विचार

- १. आपण म्हणता ते ठीक आहे. मला माहित आहे की सुर्वे वेढा सोडून मधेच प्रभानवल्लीला घरी जातो.
- २. असे पहा की सिवा काल रात्री सटकला असेल तर तो एव्हाना विशाळगडाच्या पायथ्याशी सुर्वेच्या सैन्याकडून पकडला किंवा मारल्याच्या बातम्या आल्या असत्या.
- ३. या उलट सिवा विशाळगडावर पोचला असेल तर आता आपण जाऊनही उपयोग नाही.
- ४. इथे सिवा लपला आहे असा माझा पक्का संशय आहे. म्हणून याच ठिकाणी तो सापडेल असा मला खात्री वाटते.
- ५. आपण सिवाला खिंडीत धरून मारले तर विजापुरच्या दरबारात बढतीचे पद त्याच्या मनात पिंगा घालत असावे.
- ६. त्याने आपल्या सैनिकांना घळीच्या सर्व बाजूंनी घेराव करू खाली उतरायला आणखी कुठे वाटा आहेत ते समजून घेतले असावे.
- ७. बंदुकची दस्ते, गन पावडरची पोती, हातगोळे आणि आणि साधारण एक हजार सैनिक जमले की एकदम हल्ला करून सिवाला संपवायचा बेत केला असावा.

सिद्दी मसूदची बदलती नियंत्रण केंद्रे



घळीत लपलेल्या बांदल मावळ्यांनी पाण्यात उतरलेल्या सिद्दीच्या सैनिकांना घायाळ करून टिपून मारून टाकले. तर खिंडीच्या वरून आलेल्यांना बाजी प्रभूंच्या पथकाने उघड्यावर दांडपट्ट्यांनी लोळवले...



एक प्रतिक्रिया,... विचारणा -

- हॅलो, आपले पुस्तक वाचले. आपण बाजी प्रभूंना पावनखिंडीच्या बाहेर काढून लढायला लावलेत ते वाचून कसेसे वाटले म्हणून तसे का केलेत समजून घ्यायचे आहे.
- एक काम करा. तुमच्या घरात रंगीत थोराड छत्री आहे ना, ती न उघडता हातात घ्या. दुसऱ्या हातात दुसरी छत्री घ्या आणि खोलीतल्या खोलीत तलवारीसारखी फिरवा. मग बोलू. ‘अहो तसे केले तर फर्निचरला फटके बसताना पाहून घरचे ओरडायला लागले, अरे टिव्हीला लागेल, फॅन खाली येईल. बस कर, नाहीतर बाहेर अंगणात जाऊन प्रात्यक्षिक करत बस’.
- आता असे समजा की टिचकी खोली म्हणजे चिंचोळी खिंड, पुढे-मागे दगडाच्या कपाऱ्या, झाडाच्या वाकड्या तिकड्या फांद्या, अशा अवस्थेत १५-२० जणांच्या हातात सळसळत्या दांडपट्ट्याच्या जोड्या असतील तर त्यांना खिंडीत लढवणार का खिंडीच्या बाहेर ते तुम्हीच ठरवा...

एका दांडपट्टा वीराला किती जागा लागते?



मुठीची पकड



३ मीटरचा घेरा व्याप्त होतो



शस्त्र प्रदर्शनात रंगलेला
बालवीर योद्धा

बाजीप्रभूंच्या दांडपट्ट्यात सापडले ते कापले गेले

- ❖ पावनखिंडीतील दोन्ही हातात तलवार धरून वार करताना चिंचोळ्या मार्गातील अडचणीत समोरासमोरच्या हातघाईत स्वतःजखमी व्हायची शक्यता असते.
- ❖ म्हणून बाजीप्रभूंनी आपल्या दांडपट्टेकरींना खिंडीच्या बाहेर मोकळ्या मैदानी भागात दांडपट्टा युद्ध करताना टेकडीवरून आलेल्या पठाणांना कचाट्यात धरून मारून टाकले.



सध्याच्या काळातील शुटिंगसाठी वापरताना काही कलाकार

मी ठरवेन तेच खरे असा अभिनिवेश नसावा.

- अस्सल कागदी पुराव्यांची कमतरता, लेखन करायची गरज न वाटणे, उसंत न मिळणे व अन्य कारणांनी मराठ्यांच्या इतिहासाला ज्ञात लढ्याच्या घटनांच्या तपशीलवार नोंदी कमी असल्याचे जाणवते.
- जी उपलब्ध साधने आहेत त्यांतील सत्यासत्यता, इतिहास लेखन करणाऱ्यांचे हेतू व पुर्वग्रह वगैरे आणखी व्यत्यय असू शकतात.
- यावरून असे वाटते की ... आज पर्यंत कथा-कादंबऱ्या, पोवाडे, वाचनातून, व्याख्यानातून, चित्रपटातून, धारकरी मोहिमातून मनावर छाप पडलेल्या घटनांपेक्षा वेगळे मान्य करायला ३ पिढ्या जाव्या लागतील.
- कालांतराने नव्या वाटेवरून दिवसा, रात्री पायी आणि घोड्यावरून मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करून पर्यटनाला चालना मिळेल.

त्याकाळातील बंधनांचे भान ठेवून

- जर आजच्या मिलिटरी कमांडरला (तो स्वत:) शिवाजी महाराज आहे व बाजीप्रभूंसारखे सरदार साथीला असतील असे मानले तर ते सध्याचे (मिलिटरी कमांडर) - शिवाजी महाराज - त्या काळातील उपलब्ध परिस्थितीत लढ्याचे नियोजन कसे करतील?
- हातात घड्याळ नाही, डोळ्याला चष्मा नाही, पायात बूट नाहीत, हातात मोबाईल, टॉर्च नाही, आग पेटवायला आगपेटी नाही. अशा त्या काळातील उपयोगातील नियंत्रित वस्तूंना, शस्त्रसंभाराला वापरून –
- तलवारी, भाले, गोफणी, क्वचित सेनेकडे ठासणीच्या बंदुका, तोफांच्या मारा करायची कला व साहित्य असेल इतपत प्रगत दूरमारक शस्त्रे अशा अंगाने विचार करायला हा धागा प्रवृत्त करत आहे...


अनेक शक्यता पडताळून पाहायला काय हरकत आहे ?

- यातून त्या लढाईच्या घटनांच्या निदान ७० ते ८० टक्के जवळपास आपण जाऊ शकतो का?
- आपणांपैकी सेनेबाहेरील अभ्यासू सदस्यांनी आणि सेना दलातील माहितगारांनी यावर आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग करून काय व कसे नियोजन करता आले असेल.
- प्रत्यक्ष घटना घडताना त्या नियोजनात वेळोवेळी बदल करून शेवटी सुरक्षितपणे गडावर कसे ते पोहोचले असावेत यावर लिहावे. मी देखील माझ्या बाजूने प्रयत्न करीन.


प्रत्येक वर्षी हजारो शिवभक्त मोहिमांत सहभागी होतात. या मोहिमेचा मार्ग आणि नकाशा

- ❖ त्यांनी लाल ठिपक्यांनी दर्शवलेला मार्ग सध्याचे धारकरी दर वर्षाच्या जून-जुलैत जाताना वापरतात. त्या ऐवजी हिरव्या रंगाच्या डोंगर रांगांच्या खालून जाता येऊ शकेल असे मिलिट्री कमांडर मानतात.
- ❖ परंतु प्रत्यक्ष त्या वाटेने जाऊन पाहिल्या शिवाय त्या मार्गाला पक्का ठरलेला मार्ग असे मानू नये. ही

- डॉ. अमर अडके, अध्यक्ष, डिस्ट्रिक्ट माउंटेनिअरिंग असोसिएशन यांच्या सौजन्याने



पावनखिंड नक्की आहे कुठे?



सिद्दी जोहरचा मुख्य तळ पन्हाळगडाबाहेर कुठे असावा?



भाग २ मधे काय वाचाल ?





- ❖ शिवाजी महाराजांनी कासारी नदी पार कशी केली?
- ❖ गजापुरच्या पठारावर आल्यावर तिथे काय समोर आले?
- ❖ सुर्वे आणि दळवी यांच्या सैनिकी तळाला महाराजांनी कसे चकवले?
- ❖ विशाळ गडकरी पेचात… दरवाजा किलकिला केला…
- ❖ ओल्या तोफांना पुसून, दारूगोळ्यांची जुळवाजुळव.
- ❖ दणाणला आसमंत, बलिदान सार्थकी लागले.
- ❖ उचापती हेन्री रेव्हिंग्टनमुळे, राजापुरची वाताहत, आज राजापुर गुप्त गंगेमुळे कसे दिसते?


Alka Oak's E Book Shoppy
विंग कमांडर शशिकांत ओक यांच्या
वैशिष्ठ्यपूर्ण लेखनशैलीतील ईबुक
वाचा कोणतेही E-BOOK
फक्त 10 रुपयांत
चक्रावून टाकणारा चमत्कार
नाडी भविष्य
Autowriting | ऑटोरायटिंग
मराठ्यांच्या लढायांचा इतिहास
नरवीर तानाजींची शौर्य गाथा
लढा पावनखिंडीतला
लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा मरता कामा नये...
मीनाकुमारीला मुलगी होती?
ताजमहालावर नवा प्रकाश
'अंनिस'वाल्यांचा खरा चेहरा
मोबाईल, लॅपटॉपवर सवडीने वाचा.
संपर्क
9881901049